महाराष्ट्र जनशक्ती
ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : ८१ वा | दिनांक : २२/१२/२०२४ | वार : रविवार

# सरकारकडून खातेवाटप जाहीर, गृह खाते फडणवीसांकडेच



**मुंबई :** मंत्रिमंडळाचा विस्तार झाल्यानंतर खाते वाटप कधी होणार, अशी चर्चा सुरू होती. अशात सरकारच्या वतीने आज रात्री खातेवाटप करण्यात आले असून देवेंद्र फडणवीस यांच्याकडेच गृहमंत्रालय असणार आहे. तर अर्थ खाते हे अजित पवारांकडे देण्यात आले आहे. गृहखात्यासाठी अडून बसलेले एकनाथ शिंदे यांना नगर विकास खात्यासोबतच गृहनिर्माण खाते दिले आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गृह खात्यासोबतच ऊर्जा, कायदा व न्यायव्यवस्था, सामान्य प्रशासन आणि माहिती व प्रसारण खाते स्वत:कडेच ठेवले आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे अर्थसह उत्पादन शुल्क खात्याची जबाबदारी देण्यात आली आहे. तर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे नगर विकाससह, गृहनिर्माण, ग्रामविकास आणि सार्वजनिक बांधकाम विभागाची जबाबदारी देण्यात आली आहे.

**कॅबिनेट मंत्री**

चंद्रशेखर बावनकुळे – महसूल, राधाकृष्ण विखे पाटील - जलसंधारण ( गोदावरी व कृष्णा खोरे विकास)

हसन मुश्रीफ - वैद्यकीय शिक्षण, चंद्रकांत पाटील - उच्च व तंत्रशिक्षण, संसदीय कामकाजमंत्री, गिरीश महाजन - जलसंधारण (विदर्भ, तापी, कोकण विकास), आपत्ती व्यवस्थापन, गुलाबराव पाटील – पाणीपुरवठा, गणेश नाईक – वन, दादाजी भुसे - शालेय शिक्षण, संजय राठोड - माती व पाणी परीक्षण, धनंजय मुंडे - अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण, मंगलप्रभात लोढा - कौशल्य विकास, रोजगार, उद्योग व संशोधन, उदय सामंत - उद्योग व मराठी भाषा, जयकुमार रावल - विपणन, प्रोटोकॉल, पंकजा मुंडे - पर्यावरण व वातावरण बदल, पशुसंवर्धन

अतुल सावे - ओबीसी विकास, दुग्धविकास मंत्रालय, ऊर्जा नुतनीकर, अशोक उईके - आदिवासी विकास मंत्रालय

शंभूराज देसाई - पर्यटन, खाण व स्वातंत्र्य सैनिक कल्याण मंत्रालय, आशिष शेलार - माहिती व तंत्रज्ञान,दत्तात्रय भरणे - क्रीडा व अल्पसंख्याक विकास व औकाफ मंत्रालय, अदिती तटकरे - महिला व बालविकास, शिवेंद्रराजे भोसले - सार्वजनिक बांधकाम, माणिकराव कोकाटे – कृषी, जयकुमार गोरे - ग्रामविकास, पंचायत राज, नरहरी झिरवाळ - अन्न व औषध प्रशासन, संजय सावकारे – कापड, संजय शिरसाट - सामाजिक न्याय, प्रताप सरनाईक – वाहतूक, भरत गोगावले - रोजगार हमी, फलोत्पादन, मकरंद पाटील - मदत व पुनर्वसन, नितेश राणे - मत्स्य आणि बंदरे, आकाश फुंडकर – कामगार, बाबासाहेब पाटील – सहकार, प्रकाश आबिटकर - सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण

**राज्यमंत्री**

माधुरी मिसाळ - सामाजिक न्याय, अल्पसंख्याक विकास व औकाफ मंत्रालय, वैद्यकीय शिक्षण, आशिष जयस्वाल - अर्थ आणि नियोजन, विधी व न्याय, मेघना बोर्डीकर - सार्वजनिक आरोग्य, कुटुंब कल्याण, पाणी पुरवठा, इंद्रनील नाईक - उच्च आणि तंत्र शिक्षण , आदिवासी विकास आणि पर्यटन, योगेश कदम - ग्रामविकास, पंचायत राज, पंकज भोयर – गृहनिर्माण, महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकीच्या निकालानंतर २३ व्या दिवशी रविवारी नागपुरात मंत्रिमंडळाचा विस्तार झाला. फडणवीस सरकारमध्ये ३३ कॅबिनेट आणि ६ राज्यमंत्र्यांनी शपथ घेतली. मुख्यमंत्री आणि २ उपमुख्यमंत्र्यांसह ही संख्या ४२ झाली आहे. मंत्रिमंडळात एकूण ४३ मंत्री शपथ घेऊ शकतात. तर, एक जागा रिक्त ठेवण्यात आली आहे.

फडणवीस सरकारमध्ये भाजपच्या १९, शिवसेनेच्या ११ आणि राष्ट्रवादीच्या कोट्यातील ९ मंत्र्यांचा समावेश करण्यात आला आहे. शिंदे सरकारमधील १२ मंत्र्यांना त्यात स्थान मिळाले नाही. यामध्ये भाजपचे ४, शिवसेनेचे ३, राष्ट्रवादीचे ५ मंत्री आहेत. तर, १९ नवीन आमदार मंत्री झाले. यामध्ये भाजपचे ९, शिवसेनेचे ८ आणि राष्ट्रवादीचे ४ उमेदवार आहेत.

याशिवाय ४ महिला (३ भाजप, १ राष्ट्रवादी) आणि १ मुस्लीम (राष्ट्रवादी) यांना सरकारमध्ये स्थान मिळाले आहे. सर्वात तरुण मंत्री राष्ट्रवादीच्या आदिती तटकरे (३६) आहेत, तर सर्वात वयस्कर मंत्री भाजपचे गणेश नाईक (७४) आहेत.

## मोफत वीज देण्याची योजना पुढील ५ वर्षे चालू ठेवण्याचा सरकारचा निर्धार



**छत्रपती संभाजीनगर :** शेतकऱ्यांना सिंचनासाठी मोफत वीज देण्याची योजना पुढील पाच वर्षे चालू ठेवण्याचा सरकारचा निर्धार आहे. मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० या योजनेमुळे शेतकऱ्यांना दिवसा अखंडित वीज पुरवठा करण्यासोबतच त्यांना मोफत वीज देण्यासाठी होणाऱ्या खर्चाची भरपाई होणार आहे, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत दिली.

शेतकऱ्यांना दिवसा अखंडित थ्री फेज वीज पुरवठा करण्यासाठी मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० या योजनेचे काम सुरू केले आहे. त्या अंतर्गत एमएसईबी सोलर अॅग्रो पॉवर लिमिटेड ही देशातील पहिली शेतकऱ्यांना वीज देणारी कंपनी स्थापन केली. कंपनीच्या अंतर्गत १६ हजार मेगावॅट क्षमतेचे वीजनिर्मीतीचे सौर ऊर्जा प्रकल्पांचे काम सुरू केले आहे. यामध्ये ८४२८ कृषी वाहिन्या (फीडर्स) सौर ऊर्जेवर चालवणार आहेत.

आतापर्यंत ६६९ मेगावॅट एवढी क्षमता कार्यान्वित झाली आहे. त्यातून १, ३०,४८६ कृषी ग्राहकांना दिवसा वीज पुरवठा सुरू केला आहे. २०२६ पर्यंत १६ हजार मेगावॅटची कामे पूर्ण करून सर्व शेतकऱ्यांना दिवसा अखंडित वीज पुरवठा करण्याचा प्रयत्न असून शेतकऱ्यांकडून आगामी पाच वर्षात विजेचे बिल घ्यायचे नाही, हा निर्धार कायम आहे.

शेतकऱ्यांना मोफत वीज देण्यासाठी अर्थसंकल्पावर सध्या १५ हजार कोटी रुपयांचा भार पडतो तेवढेच पैसे मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेमुळे वाचणार आहेत. सध्या आठ रुपये प्रतियुनिट दराने मिळणारी वीज शेतकऱ्यांना दीड रुपये प्रती युनीट दराने उपलब्ध केली जाते. आता हे बिलही सरकार भरते. मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेत तीन रुपये प्रति युनिट दराने वीज मिळणार असल्याने वीज खरेदीत दहा हजार कोटी रुपये वाचतील. तसेच अनुदान आणि क्रॉस सबसिडीच्या पाच हजार कोटी रुपयांची बचत होईल. परिणामी २०२६ पर्यंत शेतकऱ्यांना दिवसा वीज पुरवठा करण्यासोबतच त्यांच्या मोफत वीज योजनेचे पैसेही मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेमुळे वाचणार आहे. मागेल त्याला सौर कृषी पंप योजनेचे गतीने काम चालू आहे. त्यासाठी ९ लाख कृषी पंप उपलब्ध आहेत. त्यामुळे पेड पेंडिंग आता संपुष्टात येईल.

आतापर्यंत २,३६,१८६ सौर कृषी पंप आस्थापित केले आहेत. राज्याची आतापर्यंतची स्थापित वीजनिर्मिती क्षमता ४४ हजार मेगावॅटची आहे. आता ५४ हजार मेगावॅटचे वीज खरेदीचे करार झाले आहेत. सध्या वीज पुरवठ्यामध्ये १६ टक्के वीज अपारंपरिक तर ८४ टक्के पारंपरिक आहे. आपण हाती घेतलेल्या प्रकल्पांमुळे २०३० पर्यंत राज्यात ५२ टक्के वीज पुरवठा अपारंपरिक विजेचा म्हणजेच हरित ऊर्जेचा असेल तर ४८ टक्के वीज पुरवठा पारंपरिक असेल, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002
महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार २२ डिसेंबर २०२४


## ड्रेनेज लाईन चे अर्धवट काम पूर्ण न झाल्यास कन्नड मधील शिवनगर येथील नागरिकांनी दिला नगरपरिषदेसमोर आमरण उपोषणाचा इशारा





**कन्नड (अक्षय चव्हाण) :** मधील शिवनगर व गोरोबनगर येथील गटारातील व शौच्याचे पाणी रस्त्यावर आल्याने येथील नागरिकांना नरक यातना सोसाव्या लागत आहे. तसेच येथील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे तरी वरिष्ठ अधिकारी यांनी योग्य ती उपाययोजना करावी अशी मागणी नागरिकांनी केली.

नागरिकांनी याचे निवेदन अधिकाऱ्याकडे देऊनही अधिकारी याकडे दुर्लक्ष करत आहे असा आरोप नागरिकांनी केला आहे या पाण्यामुळे चहूकडे दुर्गंधी पसरली आहे व डासांचाही सुळसुळाट झाला आहे तसेच येथील नागरिकांचे घरात बसनेही अवघड झाले आहे.

त्यामुळे याची लवकरात लवकर उपाय योजना करावी नाहीतर येथील त्रस्त नागरीक समाज सेवक दिपक डोळस, किशोर पंडित, लक्षण डोळस, भैय्या भोकरे, गणेश गाडेकर, रामदास पंडित, परमेश्वर मोठे, प्रमोद शिरसे, शेर खान, गुलाम अहेमद खानरा. शिवनगर गोरोबा नगर रोड यांनी आमरण उपोषणाचा इशारा दिला आहे.

## डॉ.काणे विद्यामंदिरात स्नेहसंमेलन



**नंदुरबार :** शहरातील डॉ.काणे विद्यामंदिरात स्नेहसंमेलनाचे आयोजन करण्यात आले. शालेय जीवनात विद्यार्थी विकास साधत असताना शैक्षणिक, क्रीडा विकास साधताना विद्यार्थ्यांच्या अंगी असलेल्या सुप्त गुणांना वाव मिळण्यासाठी व आपल्या अंगी असलेली कला प्रस्तूत करण्याची संधी जर मिळाली तर भविष्यात विद्यार्थी करिअर करताना मोठा कलाकार बनू शकतो, असे प्रतिपादन नंदुरबार एज्युकेशन सोसायटी नंदुरबारचे अध्यक्ष नरेंद्र सराफ यांनी केले. स्नेहसंमेलनात 392 मुलांनी सहभाग नोंदवला. राष्ट्रीय एकात्मता, भारतीय संस्कृतीचे दर्शन, शेतकरी नृत्य, आदिवासी नृत्य, देशभक्तीपर गीत, कोळी नृत्य सादर करण्यात आले.

कार्यक्रमात सचिव प्रा.प्रशांत पाठक, डॉ.समिधा नटावदकर, कल्पना सराफ , मुख्याध्यापिका सुलभा महिरे उपस्थित होते. कार्यक्रमाचे उद्घाटन संस्थेचे अध्यक्ष नरेंद्र सराफ यांच्या हस्ते झाले. परीक्षक सुनीता चव्हाण, डॉ.खुशबू वाघ, अल्पिता देशपांडे यांनी काम पाहिले. सूत्रसंचालन प्रवीण परदेशी, वृषाल पाटील व जयश्री बागुल यांनी केले. आभार पुष्पलता चौरे यांनी मानले. घ.रा. बेडसे, पुष्पलता चौरे, अमित वसावे, प्रवीण परदेशी, अनिता पाठक उपस्थित होते.

## गौतमी पाटील पुणे पुस्तक महोत्सवात



**पुणे :** आतापर्यंत अनेक ठिकाणी मला कार्यक्रमास नाचणयासाठी बोलावले जाते. पण मी प्रथमच पुणे पुस्तक मोहत्सवामध्ये पुस्तक वाचनसाठी आले आहे. मला जीवनात पुस्तक वाचन संधी कधीच मिळाली नाही.

परंतु आज मला ती संधी अभिनेते प्रवीण तरडे यांच्या माध्यमातून मिळाली आहे. अनेक ठिकाणी प्रवास करताना मला मोकळा वेळ मिळतो त्यावेळी पुस्तक वाचनास वेळ आता मिळेल. आज मला संधी पुस्तक वाचन मिळालेली आहे असे मत प्रसिद्ध नृत्यांगना गौतमी पाटील हीने पत्रकारांशी बोलताना व्यक्त केले. याप्रसंगी फुलवंती चित्रपट लेखिका स्न्हेल तरडे यांच्या हस्ते पुस्तके देऊन तिचा सन्मान करण्यात आला.

गौतमी पाटील म्हणाली, मी केवळ जीवनात आजपर्यंत नृत्य शिकले पण आज वेगळी संधी मला प्राप्त झाली आहे. मी आजपासून पुस्तक वाचन करण्याचे ठरवले आहे. माझा जीवन संघर्षमय असून माझ्या शिक्षण याबाबत सर्वांना माहिती आहे. त्यामुळेच आता मी पुस्तक वाचन करण्याचे ठरवले आहे. पुस्तक वाचन मध्ये सुरवातीला छत्रपती शिवाजी महाराज यांच्यावरील पुस्तके मी वाचन करणार आहे.

प्रवीण तरडे म्हणाले, गौतमी हीची कला आणि संदेश समजापर्यंत आगामी काळात चांगल्या प्रकारे जाईल. स्व.अण्णाभाऊ साठे यांचे 'फकिरा ', ' आवडी', 'पाझर ' ही पुस्तक मी तिला भेट देत आहे त्यांचा लढा वाचून तिला पुढील आयुष्यात प्रेरणा मिळेल.

## यशवंतराव चव्हाण महाविद्यालयात स्पर्धा परीक्षा व्याख्यानाला उस्फूर्त प्रतिसाद




**सिल्लोड :** राजर्षी शाहू डिफेन्स अकॅडमी व यशवंतराव चव्हाण महाविद्यालय सिल्लोड यांच्या संयुक्त विद्यमाने "स्पर्धा परीक्षा पुस्तकांचे भव्य प्रदर्शन व स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन" कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी उद्घाटक व मार्गदर्शक म्हणून सिल्लोड ग्रामीण पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक मा. सचिन क्षीरसागर साहेब होते. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.अशोक पंडित होते. सुरुवातीला मान्यवरांच्या हस्ते संत ज्ञानेश्वरांच्या प्रतिमेचे पूजन व स्पर्धा परीक्षा ग्रंथ प्रदर्शनाचे फित कापून उद्धाटन करण्यात आले.

उद्धाटन प्रसंगी मार्गदर्शन करताना सचिन क्षीरसागर यांनी विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेमध्ये यशस्वी होण्याचा मूलमंत्र दिला. विद्यार्थ्यांनी जीवनात ध्येय निश्चित करून स्पर्धा परीक्षेत यशस्वी व्हावे. स्पर्धा परीक्षेचा अभ्यासक्रम, पुस्तकाचे आकलन, प्रश्नपत्रिकाचे निरीक्षण, चालू घडामोडीसाठी वर्तमानपत्राचे वाचन महत्त्वाचे आहे. आई-वडिलांच्या कष्टांचा विचार करून त्यांच्या डोळ्यात आनंद निर्माण करणारे यश संपादन करा.परिस्थितीचे भांडवल न करता स्मार्ट वर्क करा. स्पर्धा परीक्षेत पुस्तकाच्या संकलनापेक्षा आकलन महत्त्वाचे आहे. स्पर्धा परीक्षेत मोठे स्वप्न बघून जीवनात यशस्वी व्हा.

अध्यक्षीय समारोप करताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अशोक पंडित म्हणाले की, ग्रामीण भागातील शेतकरी, शेतमजूर पालकांच्या मुलांना स्वावलंबी बनवण्यासाठी स्पर्धा परीक्षा पुस्तकांची खरेदी केली. प्रतिकूल परिस्थितीमधील विद्यार्थ्यांनी या पुस्तकांचा अभ्यास करून अधिकारी व्हावे. स्पर्धा परीक्षेचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांनी खचून न जाता कसून अभ्यास करावा. प्रत्येक क्षेत्रात स्पर्धा आहे. विद्यार्थ्यांनी अभ्यासाच्या माध्यमातून अधिकारी पदाची पात्रता निर्माण करावी असे अहवान केले.

पुस्तक प्रदर्शनात पोलीस, आर्मी, नेव्ही, तलाठी ,ग्रामसेवक, कृषी सहाय्यक, जलसंपदा, भूमि अभिलेख व स्पर्धा परीक्षेची विषयनिहाय पुस्तके व मासिके ठेवण्यात आली होती. या प्रदर्शनाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना अनेक लेखकांच्या नवीन आवृत्तीच्या पुस्तकाचे दर्शन घडले. विद्यार्थ्यांच्या मनात वाचनाची उत्सुकता या प्रदर्शनाने निर्माण केली. स्पर्धा परीक्षेचे प्रदर्शन व व्याख्यानास महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. ज्ञानेश्वर शेजुळ, प्रास्ताविक प्रा.ज्ञानेश्वर हिलाले, आभार प्रा. निलेश गांगुर्डे यांनी मानले. यावेळी डॉ. जगदीश सावदेकर, प्रा. आजिनाथ काकडे, प्रा. निलेश मिसाळ, प्रा. जैस्वाल स्पर्धा परीक्षा व पोलीस भरतीची तयारी करणारे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार २२ डिसेंबर २०२४


## मानसिक, शारीरिक आणि बौद्धिक विकासासाठी ध्यानधारणा आवश्यक : दिगंबर कुलकर्णी



**मुरुम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** दि. २१ डिसेंबर रोजी श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयात एनसीसी, एनएसएस, करिअर कट्टा अंतर्गत आंतरराष्ट्रीय ध्यानधारणा दिवस साजरा करण्यात आला. यावर्षापासुन पासून संपूर्ण जगामध्ये आंतरराष्ट्रीय ध्यानधारणा दिवस साजरा करण्यात येत आहे या अनुषंगाने महाविद्यालयात कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते.

याप्रसंगी श्री श्री रविशंकर विद्या मंदिराचे मुख्याध्यापक दिगंबर कुलकर्णी यांनी आपल्या भाषणात ध्यानधारणा या विषयाचे महत्त्व सांगुन मार्गदर्शन केले. त्यांनी प्रत्येक व्यक्तीला जीवनामध्ये जसे शरीरासाठी योग, प्राणायाम आवश्यक आहे तसेच मनाच्या आरोग्यासाठी ध्यानधारणा तेवढीच महत्त्वाची आहे.

यामुळे अनेक रोगापासून व्यक्तीला निरोगी ठेवण्यास मदत होते. शारीरिक, मानसिक, बौद्धिक या सर्व गुणांचा विकास ध्यान धारणेमुळे वृद्धिंगत करता येतो. आर्ट ऑफ लिविंग च्या माध्यमातून याचे जागतिक स्तरावर प्रचार व प्रसार करण्यात येत यासाठी शाळा महाविद्यालयात या ध्यानधारणा वरती मार्गदर्शन करणे गरजेचे आहे असे त्यांनी सांगितले.

हिरानाथ सगर सरांनी आर्ट ऑफ लिव्हिंग चे प्रमुख श्री श्री रविशंकर यांचे ध्यान धारणेचे प्रात्यक्षिक कॅडेटस, विद्यार्थ्यांकडुन करून घेतले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. संजय अस्वले या कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती उप्राचार्य डॉ. विलास इंगळे, डॉ. पदमाकर पिटले, डॉ. प्रदीप पाटील डॉ. चंद्रसेन करे उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचलन डॉ. गिरीधर सोमवंशी व कॅप्टन डॉ. ज्ञानेश्वर चिट्टमपल्ले यांनी आभार मानले. या कार्यक्रमास डॉ. उदय मोरे यांनी सहकार्य केले कार्यक्रमास प्राध्यापक, कॅडेटस, विद्यार्थी, कर्मचारी उपस्थित होते.


मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी.सेंटर

साहिल कॉम्प्युटर्स अॅण्ड प्रिंटर्स

डॉ.बा.आं.म.विद्यापीठ गेटजवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद.

मो. 8087880274, 8956362639, 9270446603, 9405109103

डी.टी.पी. (मराठी, हिंदी, इंग्रजी)

- प्रोजेक्ट रिपोर्ट
- पीएच.डी./एम.फिल.थेसिस
- डी.एड.,एम.एड.प्रोजेक्ट
- स्पायरल व हार्ड बायडींग
- डेझर्टेशन
- कलर प्रिंट
- स्कॅनिंग
- लॅमिनेशन

महाराष्ट्रातील सर्वच विद्यापीठाच्या 1300 पेक्षा जास्त पीएच.डी. 1500 एम.फिल., 4000 हून अधिक डेझर्टेशन्सचा अनुभव, कुशल ऑपरेटर्स, लाईट गेल्यास इन्व्हर्टरची सोय असलेले मराठवाड्यातील नं. 1 चे डी.पी.पी. सेंटर

अनुभव नसलेल्यांकडे जाऊन मानसिक व आर्थिक त्रास करून घेण्यापेक्षा.. अनुभवी ऑपरेटर्सकडून अचूक व उत्कृष्ठ कामासाठी अवश्यक संपर्क साधा.

Contact No.- 8956362639 / 8087880274

Email - sahilcomputer05@gmail.com


# महापुरुष


## डॉ. बाळासाहेब लिहिणार
## मो. ९४२१२ ४५३०९




हजारो वर्षाचा इतिहास आहे
भारत भुमीवर महापुरुषांना
एक धोका आहे,
नीच पुरुषांना महापुरुष
अन् महापुरुषांना नीच पुरुष
म्हणायचं हा येथील कर्मठ
लोकांनी घेतलेला एक ठेका आहे.

रामायणात राम लक्ष्मणास महापुरुष
अन् रावणास नीच म्हणून सांगितलं
उलगडा केला तेव्हा कळलं महापुरुष
रामाणं पवित्र सीतेस अग्निपरिक्षेस भाग पाडलं
तर लक्ष्मणनानं सुपर्णाखेचं नाक स्तन कापलं

महाभारतात एक युद्ध झालं अति भारी
विधवा झाल्या त्यात सोळा सहस्र नारी
कृष्ण माझ्या बायका म्हणून त्यांना पुकारे
बघा ही धर्म ग्रंथातील कहाणी आहे.
हजारो वर्षाचा इतिहास आहेत
भारत भूमीवर महापुरुषांना एक धोका आहे...

महापुरुष म्हणतात गांधीजींना
केले देशाचे तुकडे
धोक्यामध्ये सैनिक मारतात
बिचारे घरचे पडतात उघडे.
इंग्रजांच्या शर्यतीवर बाबासाहेबानी
लक्ष वेधले घटनेकडे
तरीही काहीजण देशद्रोही म्हणून फोडतात
बाबासाहेबांच्याच नावाने खडे
बघा कशी उलटी दुनिया ही
ही भल्या माणसाची कहाणी
हजारो वर्षाचा इतिहास आहे
भारत भूमीवर महापुरुषांना एक धोका आहे,
नीच पुरुषांना महापुरुष अन् महापुरुषांना नीच पुरुष म्हणायचं
हा येथील कर्मठ लोकांनी घेतलेला एक ठेका आहे.